नि.क्र.४३

**प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे साक्षीदार क्र. १ चा उलटतपास प्रतिवादी क्र. ३/१ तर्फे विधीज्ञ श्री. एम. के. शिवलकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू:-**

५. मला लिहता वाचता येत नाही. मला ७/१२ उता-यावरील नावे एखादे कळते किंवा नाही. मी शिवली येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, मी शिवली येथे माझ्या पत्नी व मुलांसोबत एकत्र कुटूंबात राहतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ वारल्यापासून मी प्रतिवादी क्र.३/१ ते ३/३ यांची देखभाल करत आहे व त्यांच्यासोबत राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी प्रकृती सध्या चांगली आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की, बाकीच्या मुलांना कमी मिळकत मिळावी म्हणुन मी वादी हिच्याशी संगणमत करून बक्षीस पत्र करून दिले. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे खोटे सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.12.05 11:35:02 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः-०४.१२.२०२५ दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.